**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र: व.वि.श.म./ / /२५-२६**
**दिनांक : 12/08/2025**

# वसई-विरार शहर महानगरपालिका

## आगामी गणेशोत्सवानिमित्त महानगरपालिकेच्या तयारीची मा.आयुक्त महोदयांकडून पाहणी

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सुरु असलेल्या तयारीची पाहणी आज मा.आयुक्त श्री. मनोजकुमार सूर्यवंशी यांनी केली. विविध ठिकाणच्या विसर्जन स्थळी करण्यात येत असलेल्या तयारीचा आढावा घेताना गणेशभक्तांची कुठलीही गैरसोय होणार नाही यांची खबरदारी घेण्याचे निर्देश मा.आयुक्तांनी संबंधितांना दिले. तसेच विसर्जनस्थळांवर शिस्तबद्ध पद्धतीने विसर्जन कसे होईल याबाबतचे मार्गदर्शनही मा.आयुक्तांनी केले. मागील वर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा केला जाईल, असा विश्वास आयुक्तांनी व्यक्त केला आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेतर्फे दरवर्षी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा केला जात असून, मागील वर्षी एकूण विसर्जनाच्या ५८ टक्के विसर्जन हे महापालिकेच्या कृत्रिम तलावात झाले होते. यावेळीही महानगरपालिकेमार्फत विसर्जन स्थळी कृत्रिम तलाव, मूर्ती संकलन केंद्र, वैद्यकीय मदत कक्ष, आरती स्थळे, निर्माल्य कलश, दिवाबत्ती सोय तसेच इतर सुरक्षेच्या सर्व उपाययोजना करण्यात येणार आहेत, या सर्व उपाययोजनांचा आढावा मा. आयुक्त महोदयांनी घेतला.

या पाहणी दौऱ्यावेळी मा. अतिरिक्त आयुक्त श्री. दिपक सावंत, सहाय्यक आयुक्त श्री. गिल्सन गोन्सालवीस व इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.